दैनिक महासत्ता इचलकरंजी १०

शुक्रवार, ता.२९ एप्रिल २०२२

# डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी महोत्सवाची आज सांगता

**कोल्हापूर ता.२८(प्रतिनिधी)–**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी महोत्सवाचा सांगता समारंभ आज शुक्रवारी (ता.२९ एप्रिल)आयोजित केला आहे.या समारंभासाठी अदृश्य काडसिद्धेश्वर महाराज हे प्रमुख पाहुणे तर श्रीमंत शाहू महाराज अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. ताराबाई पार्क येथील विवेकानंद शिक्षण संस्था कार्यालय परिसरात सकाळी १०.३० वाजता हा कार्यक्रम होणार आहे, अशी माहिती संस्थेच्या सचिव प्रा.शुभांगी गावडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

विविध कार्यक्रमाद्वारे शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे करण्यात आले. जन्मशताब्दी महोत्सव सांगता समारंभाला खास.संभाजीराजे, संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील,कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सहसचिव प्राचार्य डॉ.आर.व्ही. शेजवळ, एम. एस. गवळी यांची उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमात शाहीर आझाद नायकवडी पोवाडा सादर करणार आहेत.

यानिमित्त शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे जन्मशताब्दी महोत्सव स्मरणिका, अर्चना पानारी यांचा परिसस्पर्श, प्रा.डॉ. विनोद कुमार वायचळ यांनी हिंदीत अनुवादित केलेला शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे व्यक्तित्व व कार्य आणि प्रा. डॉ.मच्छिंद्र नांगरे यांचा डॉ. बापूजी साळुंखे आणि मराठवाडा या ग्रंथाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. पत्रकार परिषदेला संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, चंद्रशेखर दोडमणी, प्रा.अशोक पाटील, प्रा.किरण पाटील, प्रा.कविता तिवडे आदी उपस्थित होते.

तरुण भारत शुक्रवार, २९ एप्रिल २०२२

# मानव्याचे अधिष्ठान : ईशतत्व दर्शन

**श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संकल्पक, संस्थापक, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे २०१८-१९ जन्मशताब्दी वर्ष. संस्थेच्या ४०७ शाखांमध्ये विविध उपक्रमांनी ते साजरे केले. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी महोत्सवाची सांगता शुक्रवारी, २९ रोजी सकाळी १० वाजता विवेकानंद कॉलेजच्या प्रांगणात कणेरीमठाचे स्वामी काडसिद्धेश्वर व श्रीमंत छत्रपती शाहू यांच्या उपस्थितीत होत आहे. त्या निमित्त...**



शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यातील बहुजन समाजापर्यंत शिक्षण पोहोचवण्याचे अव्याहतपणे कार्य केले आहे.

सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील रामापूर येथे ९ जून १९१९ रोजी जन्म झालेले व वयाच्या बाराव्या वर्षात आईवडिलांच्या मायेला पोरके झालेले गोविंद ज्ञानोजी साळुंखे ऊर्फ शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांना भजन, गायन, वाचनाचा छंद होता. हलाखीच्या स्थितीत त्यांनी शिक्षण पूर्ण केले. साधेपणा, अभ्यासूवृत्ती, तेजस्वी चेहरा, धीरगंभीर स्वभाव, नम्रता, चारित्र्यसंपन्नता, आज्ञाधारक वृत्ती ही त्यांची स्वभाव वैशिष्ट्ये. आप्पासाहेब पवार यांची बापूजींवर खूप मर्जी होती.

बापूजी सोंडूर संस्थानाचे राजगुरू बनले. त्यांनी भूमिगत राहून स्वातंत्र्यलढ्यात योगदान दिले. १९४८ मध्ये त्यांनी कर्मवीरांच्या रयत शिक्षण संस्थेत प्रवेश करून शिक्षकाची नोकरी पत्करली. कराडमधील मुरलीधर मंदिरात काही निवडक साथीदारांच्या सोबतीने १९५४ मध्ये बापूजींनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली. ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार हे ब्रीद त्यांनी स्वीकारले, यावरून त्यांच्या अष्टावधानी व्यक्तिमत्त्वाचा पैलू समोर येतो. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी संस्थेच्या ध्येय धोरणात समाविष्ट केलेली प्रार्थना त्यांच्या कार्याची प्रचिती देणारी आहे. मानव्याचे अधिष्ठान ईशतत्व दर्शन' यातून मानवतेचे अधिष्ठान बाळगणाऱ्या प्रत्येकाला ईश्वराचे दर्शन होईल, अशी भावना व्यक्त केली आहे. बापूजींनी उभारलेल्या वटवृक्षाचा विस्तार झाला आहे. बापूजींचा वसा आणि वारसा संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी शुभांगी गावडे अत्यंत निष्ठेने सांभाळत आहेत. संस्थेच्या ४०७ संस्कार केंद्रांमधून दहा हजार गुरुदेव ज्ञानदानाचे आणि अडीच लाख विद्यार्थी अध्ययनाचे कार्य करत आहेत आहेत. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांना त्रिवार अभिवादन..

**प्रा. डॉ. प्रदीप पाटील**
**विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)**

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार" - शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे



# श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर



शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

## जन्मशताब्दी महोत्सव सांगता समारंभ

प्रमुख पाहुणे : **मा. अदृश्य काडसिद्धेश्वर महाराज**
मठाधिपती, काडसिद्धेश्वर संस्थान, कणेरी, कोल्हापूर

अध्यक्ष : **मा. श्रीमंत शाहू छत्रपती महाराज, कोल्हापूर**

निमंत्रित

**मा. आमदार चंद्रकांत (दादा) पाटील**
अध्यक्ष, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर

**प्राचार्य डॉ. राजेंद्र शेजवळ**
सचिव, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे
जन्मशताब्दी महोत्सव समिती

**प्राचार्य अभयकुमार साळुंखे**
कार्याध्यक्ष, श्री स्वामी विवेकानंद
शिक्षण संस्था, कोल्हापूर

**आजी-माजी पदाधिकारी व सर्व सदस्य**
शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी महोत्सव समिती
**श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर**

**शुक्रवार, दि. २९ एप्रिल २०२२ * सकाळी ठीक १०.३० वाजता**
**स्थळ : विवेकानंद कॉलेज, ताराबाई पार्क, कोल्हापूर**

लोकमत

epaper.lokmat.com ४

कोल्हापूर, शुक्रवार, दि. २९ एप्रिल २०२२

# 'ज्ञानतपस्वी' डॉ. बापूजी साळुंखे!

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे जन्मशताब्दी वर्षाचा सांगता समारंभ आज, शुक्रवारी संपन्न होत आहे. यानिमित्त बापूजींच्या विचार आणि कार्याचे स्मरण या लेखाच्या माध्यमातून करत आहे.



विसाव्या शतकात महाराष्ट्राच्या जडणघडणीतील महत्त्वाची घटना म्हणजे शैक्षणिक परिवर्तनाची. या काळात समाजसुधारकांनी सुरू केलेल्या शैक्षणिक क्रांतियज्ञास सतत तेवत ठेवण्यासाठी आणि शिक्षण तळागाळांतील डोंगरदऱ्यातील गरीब, अज्ञानी जनतेपर्यंत पोहोचविण्याचे कार्य करणाऱ्यांमध्ये ज्ञानतपस्वी म्हणजे शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे हे एक प्रमुख होते.

रामपूर (जि. सातारा, ता. पाटण) या छोट्याशा गावांमध्ये ज्ञानोजीराव व तानूबाई यांच्या पोटी गोविंद अर्थातच बापूजींचा जन्म ९ जून १९१९ रोजी झाला. अत्यंत कष्टातून त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. बी.ए.बी.टी. पर्यंत शिक्षण पूर्ण करणारे गोविंदराव बोर्डिंगमधून बाहेर पडताना मात्र 'बापूजी' ह्या नावाने सर्वपरिचित झाले. महात्मा गांधीजींच्या विचारांचा गोविंदावर असलेला प्रचंड पगडा पाहून मित्रांनी बहाल केलेली 'बापूजी' ही पदवीच सर्वश्रेष्ठ ठरते.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात बापूजींनी क्रांतिसिंह नाना पाटील, नागनाथअण्णा नायकवडी यांच्याबरोबर योगदान दिले. याकाळातच कर्मवीर अण्णांनी रुकडी येथे नव्याने सुरू होणाऱ्या हायस्कूलवर मुख्याध्यापकपदाची जबाबदारी बापूजींच्यावर सोपविली. मात्र १९ ऑक्टोबर १९५४ रोजी काही मित्रांच्यासमवेत कराड येथील कोयना तीरावरील मुरलीधराच्या मंदिरात नवीन शिक्षण संस्था स्थापण्याचे रणशिंग फुंकले गेले आणि श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना झाली. अल्पावधीतच या शिक्षण संस्थेने विकासाबरोबरच विस्तार साधला. बापूजींनी समर्पित केलेले 'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार' हे ब्रीद घेऊन आज महाराष्ट्रातील ४०६ शाखांमधून सुमारे दहा हजार गुरुदेव कार्यकर्ते ज्ञानदानाचे कार्य करत आहेत तर अडीच लाख विद्यार्थी ज्ञानार्जन करत आहेत.

**- डॉ. स्वप्निल बुचडे,** विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

सकाळ
कोल्हापूर, शुक्रवार, २९ एप्रिल २०२२ ८

# मानव्याचे अधिष्ठान ईशतत्त्व दर्शन!

**श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संकल्पक, संस्थापक शिक्षणमहर्षी गोविंद ज्ञानोजी साळुंखे ऊर्फ डॉ. बापूजी साळुंखे यांचे २०१८-१९ हे जन्मशताब्दी वर्ष विविध उपक्रमांनी साजरे करण्यात आले; परंतु गेली दोन-अडीच वर्षे कोरोनामुळे सांगता समारंभ झाला नाही. हा सांगता समारंभ उद्या (शुक्रवार, ता. २९) रोजी सकाळी १०.०० वाजता विवेकानंद महाविद्यालयामध्ये होणार आहे. कणेरी मठाचे स्वामी काडसिद्धेश्वर आणि श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांची प्रमुख उपस्थिती असेल. त्यानिमित्त...**

**- प्रा. डॉ. प्रदीप पाटील**



डॉ. बापूजी साळुंखे

राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याबरोबरच शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यांत बहुजन समाजापर्यंत शिक्षण पोहोचवण्याचे अव्याहत कार्य केले. त्यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यात रामापूर येथे ९ जून, १९१९ रोजी झाला. वयाच्या बाराव्या वर्षी ते आई-वडिलांच्या मायेला पोरके झाले. त्यांना लहानपणापासूनच भजन, गायन, वाचनाचा छंद होता. बुद्धिमान असल्यामुळे एका-एका वर्षात दोन-दोन इयत्ता पास झाले. हलाखीच्या स्थितीत त्यांनी शिक्षण पूर्ण केले. साधेपणा, अभ्यासूवृत्ती, तेजस्वी चेहरा, धीरगंभीर स्वभाव, नम्रता, चारित्र्यसंपन्नता, आज्ञाधारक वृत्ती ही त्यांच्या स्वभावाची वैशिष्ट्ये होती. याच गुणांमुळे आप्पासाहेब पवार यांची त्यांच्यावर मर्जी होती. पवार यांच्या सूचनेनुसार बापूजी सोंडूर संस्थानाचे राजगुरू बनले. नंतर महात्मा गांधी यांच्या विचाराने प्रभावित होऊन स्वातंत्र्यसंग्रामात उडी घेतली. १९४८ मध्ये बापूजींनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेत अध्यापन सुरू केले. पुढे अधिक व्यापक कार्य करता यावे या हेतूने कऱ्हाडमधील मुरलीधर मंदिरात काही निवडक साथीदारांच्या सोबतीने श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची स्थापना केली.

'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार' हा उदात्त विचार बापूजींनी संस्थेचे ब्रीदवाक्य म्हणून स्वीकारला. 'ज्ञान' या दोन अक्षरी शब्दात अर्थाचे भांडार आणि जीवनाचे सार सामावले आहे. एखाद्या वस्तूच्या माहितीपासून सुरू होणारा ज्ञानाचा प्रवास मानव आणि विश्व यामधील सहसंबंधापर्यंत जाऊन पोहोचतो. त्यामुळे शिक्षणामधून ज्ञानयात्रेला प्रारंभ व्हावा आणि ज्ञानप्राप्तीमधून स्वतःच्या जीवनाचे ध्येय गाठत विद्यार्थ्यांनी विश्व कल्याणाचे पसायदान मागणाऱ्या ज्ञानेश्वरांचे वारस व्हावे, अशी अपेक्षा बापूजींना असल्याचे दिसते. आज बापूजींनी उभारलेल्या वटवृक्षाचा विस्तार झाला असून, बापूजींचा वसा आणि वारसा संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे आणि संस्थेच्या सेक्रेटरी शुभांगी गावडे निष्ठेने व तळमळीने सांभाळत आहेत. संस्थेच्या ४०७ संस्कारकेंद्रांमधून दहा हजारांवर शिक्षक ज्ञानदान करतात. तर अडीच लाख विद्यार्थी अध्ययन करतात. अशा शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांना त्रिवार अभिवादन.

**(लेखक विवेकानंद महाविद्यालयात प्राध्यापक आहेत)**

''ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार'' – शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे



**श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर**



शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे

# जन्मशताब्दी महोत्सव सांगता समारंभ

**प्रमुख पाहुणे: मा.अदृश्य काडसिध्देश्वर महाराज**

मठाधिपती, काडसिध्देश्वर संस्थान, कणेरी, कोल्हापूर

**अध्यक्षः मा.श्रीमंत शाहू छत्रपती महाराज, कोल्हापूर**

– निमंत्रित –

**मा.आमदार चंद्रकांत (दादा) पाटील**

अध्यक्ष, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर

**प्राचार्य डॉ.राजेंद्र शेजवळ**

सचिव, शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे जन्मशताब्दी महोत्सव समिती

**प्राचार्य अभयकुमार साळुंखे**

कार्याध्यक्ष, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर

**आजी–माजी पदाधिकारी व सर्व सदस्य**

शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे जन्मशताब्दी महोत्सव समिती

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर

**शुक्रवार दि.२९ एप्रिल २०२२ * सकाळी ठीक १०.३० वाजता**

**स्थळ: विवेकानंद कॉलेज, ताराबाई पार्क, कोल्हापूर**